अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. ५ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १५६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## लाच घेतल्यास गुन्हा नोट फॉर व्होटचे संरक्षण काढले

**नवी दिल्ली :** संसदेत अथवा विधीमंडळात बोलण्यासाठी अथवा मतदानासाठी लाच घेतल्यास लोकप्रतिनिधींना फौजदारी गुन्ह्यापासून संरक्षण मिळणार नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने आज दिला. पीव्ही नरसिंहराव विरूध्द प्रशासन (सीबीआय) या खटल्यात १९९८ मध्ये ३ विरूध्द दोन मतांनी दिलेला लोकप्रतिनिधींना संरक्षण देणारा निकाल फेटाळून लावला.

तत्कालीन पंतप्रधान पीव्ही नरसिंहराव यांच्यावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अजोय मुखोपाध्याय यांनी २६ जुलै १९९३ ला अविश्वास ठराव दाखल केला होता. ५२८ सदस्य असणाऱ्या लोकसभेत राव यांच्या काँग्रेस पक्षाकडे २५१ सदस्य होते. बहुमतासाठी १३ सदस्य कमी पडले होते. मात्र प्रत्यक्षात ठरावाच्या विरोधात २६५ तर बाजूने २५१ मते पडल्याने राव सरकार तरले. वर्षभराने झारखंड मुक्ती मोर्चाच्या खासदारांनी अविश्वास प्रस्तावाविरूध्द मतदान करण्यासाठी मोठ्या प्रमाणात लाच घेतल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या. त्याचा सीबीआयने १९९६ मध्ये तपास सुरू केला. झारखंड मुक्ती मोर्चाच्या



सहा खासदारांनी लाच घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले. जनता दलाचे अजित सिंग यांनी मतदानाला अनुपस्थित राहण्यासाठी लाच घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. नरसिंह राव यांनी हा खटला रद्द करावा म्हणून दाखल केलेली याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर नरसिंहराव व अन्य आरोपींनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. लोकप्रतिनिधी असल्याने त्यांना उपरोक्त प्रकरणात संरक्षण मिळत असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला होता.

# करोडो मराठ्यांच्या नाराजीची लाट सरकारच्या अंगावर

- गनिमी काव्याने करेक्ट कार्यक्रम करण्याचा इशारा
- प्रसंगी ४ कोटी मराठे उतरवू रस्त्यावर, जरांगे-पाटलांकडून सोलापुरात आक्रमणला धार

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**आरक्षणावरुन मनोज जरांगे-पाटील यांनी आज सोमवारी (ता.४) सोलापूर जिल्ह्यातील मराठ्यांमध्ये स्फुलिंग चेतवतानाच, राज्यातील मराठे सरकारचा करेक्ट कार्यक्रम कसा करतील ते पाहा, असा इशारा दिला. आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना शिंगावर घेताना मतांसाठी फिरकू नका, असा सज्जड दमसुद्धा जरांगे-पाटील यांनी सर्वच पक्षांच्या नेतेमंडळींना दिला. राज्यातील करोडो मराठ्यांची नाराजीची लाट सरकारला अंगावर घेणे परवडणारे नाही, असाही सूचक इशारा द्यायला जरांगे-पाटील विसरले नाहीत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांनी चांगलेच फैलावर घेत त्यांना मराठ्यांच्यावतीने आव्हान दिले. फडणवीस यांनी मराठ्यांच्या संदर्भात दडपशाही केल्यास राज्यातील साधारण ४ कोटी मराठे रस्त्यावर उतरवू असा खणखणीत आणि गर्भीत इशाऱ्याचे आव्हानही त्यांनी दिले.**




### नेतेमंडळींना दारात उभे करु नका

आरक्षणाला आडवे जाणाऱ्यांना धडा शिकविण्याची रणनिती वैरागच्या संवाद सभेत जरांगे-पाटील यांनी सांगितली. 'मते मागायला कोणीही येऊ नका' असे फलक आपल्या घरांच्या दारावर तसेच दुचाकी आणि चारचाकी गाड्यांवर लावा, मते मागण्यासाठी येणाऱ्यांना दारात उभे करु नका,असेही त्यांनी सांगितले.

### येत्या ९ तारखेची डेटलाईन

MARCH 9

कुणबी नोंदी निघालेल्यांच्या सग्यासोयऱ्यांना ५० टक्क्यांच्या आतून ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या अधिसुचनेची अंमलबजावणी व्हावी, यासाठी आपण येत्या ९ तारखेची डेटलाईन राज्य सरकारला देत आहेत. 'उपोषण करु नका, टोकाचे आंदोलन करु' असा सकल मराठा समाजाचा आग्रह आहे. समाजाला मी मानतो. समाज मला मानतो. मात्र, उपोषणासंदर्भात मी अजून निर्णय घेतलेला नाही, असेही जरांगे-पाटील यांनी स्पष्ट केले.

### 'त्या' आरक्षणावर समाज अजिबात नाही समाधानी

सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षणावर मराठा समाज समाधानी आहे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या विधानाचे खंडन करताना जरांगे-पाटील म्हणाले, या आरक्षणावर समाज अजिबात समाधानी नाही, राज्यात सर्वत्र हे चित्र दिसत आहे. ओबीसीमधून आरक्षण घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

### मुख्यमंत्री शिंदे बोलाताहेत आता फडणवीसांची भाषा

१० टक्क्याच्या आरक्षणावर मराठा समाज समाधानी आहे,असे मुख्यमंत्री सांगत आहेत, या मुद्द्यावर बोलताना जरांगे-पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री शिंदे हे उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भाषा बोलायला लागले आहेत. श्री शिंदे यांचा मान सन्मान करुन त्यांच्यावर सहा महिने विश्वास ठेऊन वेळ दिला, तेच आता आम्हाला उलटे बोलायला लागलेत. 'लिमीट तोडल्यावर करेक्ट कार्यक्रम करु' या मुख्यमंत्र्यांच्या विधानावर जरांगे-पाटील म्हणाले की, सरकारने मर्यादार सोडल्यावर मराठे कसा करेक्ट कार्यक्रम करतात, हे बघाच!

विशेषत्वे, आमच्या गनिमी काव्याने आणि भाषेत सरकारचा करेक्ट कार्यक्रम करु, असा पुनरुच्चारदेखील त्यांनी या दौऱ्यात प्रत्येक ठिकाणी केला. उपोषणानंतर मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे कालपासून सोलापूर जिल्ह्याच्या संवाद दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी आज वैराग, मोहोळ आणि शेटफळ या ठिकाणी मराठ्यांशी संवाद साधला. त्यांच्या या संवाद दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. संवाद सभा आणि प्रसारमाध्यमांकडे त्यांनी आपली रोखठोक भूमिका मांडली.

जाणूनबूजून खोटे आरोप करणे, मराठा समाजाचे कार्यकर्ते गुन्ह्यांमध्ये गुंतवणे, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास टाळणे, न टिकणारे १० टक्के आरक्षण लादणे, सग्यासोयऱ्यांसाठी अधिसुचना काढली मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. राज्यपाल पद आणि विधानसभा, विधानपरिषद अस्तित्वात असताना अधिसुचनेची अंमलबजावणी न करता राजपत्रित अधिसुचनेचा अपमान करणे, असे प्रकार राज्य सरकारकडून केले जात आहेत, त्यामुळे समाजामध्ये संतापाची लाट आहे. करोडोंच्या संख्येने मराठा समाज एकत्र आला आहे, त्यांचा रोष सरकार अंगावर कसे घेऊ शकते? फडणवीस यांना हे समजत कसे नाही, असे ते म्हणाले.

## पाचेगावातील वृध्द दाम्पत्याचा पोटच्या मुलाकडूनच खून

**▸ किरकोळ कारणावरून आईचा गळा आवळून तर वडिलांचा गळ्यात खुंटी मारून खून**

**सांगोला :** तालुक्यातील पाचेगाव बुद्रुक येथील वृध्द दाम्पत्याचा खून त्यांचा मुलगा समाधान भीमराव कुंभार (वय४२) यानेच केला असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.

मुलीचा जातीचा दाखला काढण्यासाठी आई-वडिलांनी शिधापत्रिका दिली नाही म्हणून रागाच्या भरात वडील भीमराव व आई सुशीला यांचा निर्घृण खून केल्याची कबुली दिली असल्याची माहिती सांगोला पोलिसांनी दिली. गावातच राहणारा मुलगा समाधान यास रविवारी पोलिसांनी ताब्यात घेऊन विश्वासात घेऊन त्याला पोलीसी खाक्या दाखविल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

वडील भीमराव कुंभार (वय ७०), आई सुशीला (वय ६५) हे दोघे पाचेगाव येथेच दुसरा मुलगा पांडुरंग यांच्या घरी राहत होते. तो मुलगा कर्नाटकात कामाला होता आणि समाधान हा पाचेगावातच वेगळा राहत होता. मुलीचा जातीचा दाखला काढण्यासाठी (पान ७ वर)

## विम्याच्या रकमेसाठी महुद गोदामात घडविला स्फोट

**▸ मालक नितीन नरोळे विरूध्द गुन्हा दाखल**

**सांगोला :** बँकेची येणारी जप्ती टाळण्यासाठी तसेच विम्याची रक्कम मिळवण्यासाठी महूद गावातील टायरच्या गोदामात स्फोट घडवण्यात आल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. या गोदामाचा मालक नितीन आरोळे यानेच हा कट रचला असून तो अद्याप फरार आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती (पान ७ वर)

## तोल-मोल के बोल...



**अजित पवार सातत्याने दावा करत आहेत की, मी त्यांना राजीनामा देण्याबद्दल बोललो होतो. परंतु, मला त्यांना विचारायचं आहे की, या काळात मी संसदेत कधी अनुपस्थित होतो का? मी संसदेत बोलणं आणि माझ्या मतदारसंघातील प्रश्न मांडणं सोडून दिलं होतं का? माझ्या कामाचा लेखाजोखा पाहिला तर एक गोष्ट मी आवर्जून नमूद करेन की तुमच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष (सुनील तटकरे) हे रायगड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या संसदीय कामगिरीपेक्षा तुम्ही ज्याला सेलिब्रिटी म्हणून हिणवता त्या अमोल कोल्हेची कामगिरी कायमच उजवी राहिली आहे. हवं तर रेकॉर्ड तपासून पाहा...**




– अमोल कोल्हे
खासदार, शिरूर

## मावळ, रायगडचे लोकसभा उमेदवार ठाकरेंकडून जाहीर

**नवी मुंबई :** एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान आणि राजधानी आहे. या जिल्ह्यांमध्ये हक्काचा भगवा फडकणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. पुन्हा जर का भाजपचं सरकार चुकून निवडून आले तर ही देशातील शेवटची निवडणूक ठरेल. पुन्हा येईन म्हणणारे घरी जातात ते पुन्हा विधानसभेत येऊ शकत नाहीत, असेही उद्धव ठाकरे यांनी या जाहीर सभेत ठणकावले. (पान ७ वर)

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'वाटपा' आधी जागेला पण विचारून घेतो !


## जागा वाटपावर शहांकडून तोडगा?

**▸ घटक पक्षांना गप्प बसवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री आज राज्यात!**

**मुंबई/विशेष प्रतिनिधी**

राज्यातील सत्ताधारी महायुतीमध्ये लोकसभेच्या जागावाटपावरून धुमशान सुरू होण्याची शक्यता असल्याने त्यावर तोडगा काढण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मंगळवारी महाराष्ट्रात येत आहेत. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील जागा वाटपाचा तिढा वाढला आहे.

भारतीय जनता पक्षाच्या १९५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्याच्या दुसऱ्या दिवशीच शहा महाराष्ट्रात येत आहेत. या पहिल्या यादीत राज्यातील एकाही जागेचा समावेश नव्हता. या दौऱ्यात शहा अकोला (विदर्भ) निवडणूकपूर्व बैठकीत मार्गदर्शन करतील. जळगावमधील युवा मोर्चाच्या शिबिरास संबोधित करतील. संभाजीनगरमध्ये त्यांची जाहीर सभा होणार आहे. भाजपाचे नेते लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुकण्यासाठी अमित शहा यांचा दौरा असल्याचे सांगत आहे.



मात्र, अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यातील महायुतीतील जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठीच शहा येत आहेत. राज्यातील जागावाटपावरून मतभेद तीव्र स्वरूपाचे आहेत. उमेदवार जाहीर करण्यापुर्वी हा तिढा सोडवावा लागणार आहे. हा तिढा शहा आल्यानंतर सुटेल, असे या सूत्रांनी स्पष्ट केले. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शहा यांची अकोल्यात बैठक घेण्यात येईल. त्यात अकोला, बुलढाणा, (पान ७ वर)

कल्याण
234-93-670

मुंबई
355-31-399

